कृपया प्रसिध्दीकरिता सादर
संपादक/वृत्तसंपादक

(हनुमंत गोफणे)
जनता संपर्क अधिकारी
बेस्ट उपक्रम
दूरध्वनी क्र.२२७९९३९५

PRESS NOTE
THE BRIHAN MUMBAI
ELECTRIC SUPPLY &
TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

बेस्ट
प्रसिद्धी पत्रक
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा
आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र.१९२,
मुंबई - ४०० ००१.

---

प्रसिध्दी पत्रक क्र. ५९
दिनांक : ०९.०२.२०१७

## बेस्ट उपक्रमाच्या 'मोबाईल तिकेटींग ॲप' या प्रकल्पाला सार्वजनिक क्षेत्राचा पुरस्कार

---

मुंबई, ०९ - मे. इलेक्टस टेक्नोमिडीया यांनी दि.३१ जानेवारी २०१७ रोजी आयोजित केलेल्या **"3rd ELTs PSU Summit 2017"** या सार्वजनिक उपक्रमांकरीता असलेल्या तिस-या शिखर परिषदेमध्ये **'माहिती आणि दळणवळण तंत्रज्ञानाचा'** अवलंब करणा-या कंपन्यांकरीता असलेला पुरस्कार बेस्ट उपक्रमाच्या **'मोबाईल तिकेटींग ॲप'** या प्रकल्पाला मिळालेला आहे.

**'माहिती आणि दळणवळण तंत्रज्ञानाचा'** अवलंब सर्वच क्षेत्रांमध्ये मोठया प्रमाणावर होण्याकरीता शासनाचे प्रयत्न सुरु आहेत. या अनुषंगाने शासनाच्या अधिपत्याखाली असलेले म्हणजेच प्रामुख्याने सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम प्रवासीभिमूख होण्याकरीता सदर सार्वजनिक उपक्रमांमधील जास्तीत जास्त कार्यभार संगणकीय स्वरुपात होणे आवश्यक आहे. याकरीता सर्व सार्वजनिक उपक्रमांनी मोठया प्रमाणात **'माहिती आणि दळणवळण तंत्रज्ञानाचा'** अवलंब करावा, यासाठी शासन स्तरावर विविध प्रोत्साहनपर कार्यप्रणाली अवलंबिण्यात येत आहेत.

याचाच एक भाग म्हणून अलिकडेच दि. ३१ जानेवारी २०१७ रोजी **मे. इलेक्टस टेक्नोमिडीया** यांच्या सौजन्याने **"3rd ELTs PSU Summit 2017"** ही शिखर परिषद सार्वजनिक उपक्रमांकरीता आयोजित करण्यात आली होती. सदर शिखर परिषदेमध्ये विविध सार्वजनिक उपक्रमांकडून अवलंबिण्यात येत

----२

असलेल्या 'माहिती व दळणवळण तंत्रज्ञाना'बाबतच्या प्रकल्पांची माहिती पुरस्काराकरीता मागविण्यात आलेली होती. या परिषदेमध्ये **बेस्ट उपक्रमाने** अलिकडेच सुरु केलेल्या **'मोबाईल तिकेटींग ॲप'** या प्रकल्पाची माहिती पुरस्काराकरीता सादर केलेली होती. **बेस्ट उपक्रमाच्या 'मोबाईल तिकेटींग ॲप' या प्रकल्पाची निवड पुरस्काराकरीता** करण्यात आली आहे.

बेस्ट उपक्रमाने मागील काही वर्षामध्ये आपल्या कार्यप्रणालीमध्ये मोठया प्रमाणावर **'माहिती आणि दळणवळण तंत्रज्ञानाचा'** अवलंब सुरु केलेला आहे. याची सुरुवात **ETIM** (Electronic Ticket Issuing Machine) ने करण्यात आली. उपक्रमाच्या बसप्रवर्तनामध्ये पारंपारिक तिकीट वितरणाऐवजी

ETIM (Electronic Ticket Issuing Machine) च्या माध्यमातून तिकीट वितरण सुरु करण्यात आले. तद्नंतर **RF-ID स्मार्टकार्डच्या माध्यमातून बसपास आणि E-purse** ची सुविधा उपलब्ध करण्यात आली. तसेच यापुढे **इंटरनेटच्या माध्यमातून बसपासचे वितरण आणि नुतनीकरण** देखील सुरु करण्यात आले.

तद्नंतर अलिकडेच **'मोबाईल तिकेटींग ॲप'** या प्रकल्पाला सुरुवात करण्यात आली. या योजनेअंतर्गत प्रवाशांना **दैनंदिन तिकीट, बसपास यांचे वितरण तसेच नुतनीकरण या सर्व सुविधा** उपलब्ध करण्यात आलेल्या असून प्रवाशांचा या उपक्रमास समाधानकारक प्रतिसाद आहे. या प्रकल्पाला **"3rd ELTs PSU Summit 2017"** या शिखर परिषदेत पुरस्कार मिळाल्यामुळे बेस्ट उपक्रमाच्या नावलौकिकात भर पडलेली आहे.

..........